**विशेष दिवाणी दावा क्रमांक – २२/२०२०**

**नि.क्र. १२/क सोबत**

**निशाणी क्र. १६ वरील आदेशान्वये उलटतपास शपथेवर सुरु**

**उलटतपास प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. आय.डी. सनदी यांचे तर्फे सुरु :-**

८. माझा चांदी व्यवसाय व शेती चा व्यवसाय आहे. माझे शिक्षण बारावी पर्यंत झाले आहे. मी चांदीचे पैंजण तयार करतो. मी गेली १०-१५ वर्षा पासुन चांदीचा व्यवसाय करतो. मी चांदीचा व्यवसाय करत असल्यामुळे त्याबाबतचा माझ्याकडे व्यवसाय परवाना आहे. मी तो परवाना या कामी दाखल केलेला नाही. मी परवाना दाखल करु शकतो. मी आयकर विवरणपत्र २०१९ पासुन भरतो. मी जीएसटी भरत नाही. मी फक्त पैंजण तयार करतो.

९. प्रतिवादीचे पती माझे शेजारी रहात होते. प्रतिवादीचे पती चांदीचे वाळे तयार करत होते. प्रतिवादीचे पतीने माझ्याकडुन ११ किलो ८०० ग्रॅम चांदी घेतली होती. सदरची चांदी ९९.९९ टंचाची होती. हे म्हणणे खरे आहे की, शुध्द चांदी ही रिफायनरी मध्ये तयार होते. हे म्हणणे खरे आहे की, रिफायनरीचा त्या चांदीच्या गटावर शिक्का असतो. सदरच्या चांदीवर कोणता शिक्का होता हे मला माहित नाही. प्रतिवादीचे पतीने माझ्याकडे दिनांक १/११/२०१८ चे पूर्वी एक महिना अगोदर मागणी केली होती. प्रतिवादीचे पतीने माझ्याकडे १२ किलो चांदीची मागणी केली होती. प्रतिवादीचे पती हा प्रोडक्शन करुन चांदीची बाहेर विक्री करत होते. हे म्हणणे खरे आहे की, ११ किलो ८०० ग्रॅम चांदी मी कोठे दिली हे प्रतिज्ञापत्रात नमुद नाही. सदर ११ किलो ८०० ग्रॅम चांदीचे विवरण मी सरतपासात नमुद केलेले नाही.

१०. सतीश चव्हाण यांनी हात ऊसनवार पावतीचा करार लिहुन दिला होता. करारासाठीचा स्टँम्प सतीश चव्हाण यांनी आणला होता. हे म्हणणे खरे नाही की, सतिश चव्हाण याने मला रक्कम रुपये शंभरचे दोन स्टँम्प आणुन दिले होते. मी सतीश चव्हाण यांचेशी व्यवहार केला होता त्या दिवशी स्टँम्प घेतला होता. हे म्हणणे

खरे आहे की, सदरचा स्टँम्प दिनांक १६/१०/२०१८ रोजी आणला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सावकारीचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, रक्कम वसुल करणेसाठी व खरेदीपत्र पुर्ण करुन घेणेसाठी मी न्यायालयात दावे दाखल केले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे पतीने माझ्याकडून पाच टक्के व्याजाने चांदी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचा पती हा मला दरमहा मुद्दल व व्याजापोटी १५९० ग्रॅम शुध्द चांदी देत होते.

११. मी प्रतिवादीचे पतीकडे सारखी चांदीची मागणी करत होतो त्यामुळे माझे त्रासाने त्याचा मृत्यु झाला आहे. माझ्याकडे चांदीचे स्टॉक रजिस्टर नाही. सदर व्यवहारा पूर्वी प्रतिवादीचे पती व माझेत व्यावहारीक संबंध नव्हते. प्रतिवादीचे पतीने लिहुन दिलेल्या ऊसनवार पावतीचे करारावर कोण साक्षीदार होते हे मी सांगु शकतो. सदर करारावर बापुसो श्रीपाल सुतार व अनिता आनंदा मोरे असे दोन साक्षीदार होते. सदरचे साक्षीदार हे प्रतिवादीचे पतींशी संबंधित आहेत. मी सतिश चव्हाण मयत झालेनंतर प्रतिवादीचे घरी सांत्वन करणेसाठी गेलो नव्हतो. मी प्रतिवादीचे नातेवाईकांना ओळखत नाही. प्रतिवादीचे पतीचे नातेवाईकांना देखील मी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीचे पतीकडून दोन कोरे स्टँम्प घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे पती व माझेत झालेला व्यवहार हा तोंडी होता. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे तोंडी व्यवहारास लेखी स्वरुप आणणेसाठी मी प्रतिवादीचे पतीकडून घेतलेल्या को-या सटँम्पचा गैर वापर केलेला आहे. ऊसनवार पावतीचा करार हा सतीश चव्हाण यांनी कोठुन टाईप करुन आणला हे मला माहित नाही. सदर करारावर सतीश चव्हाण यांचे घरी सह्या केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीची आमचे व्यवहारास कोणतीही संमत्ती नव्हती व आम्ही तिची खोटी सही केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे पतीने माझी घेतलेली सर्व चांदी परत केलेली आहे.

१२. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीचे पतीकडून घेतलेले कोरे स्टँम्प मला चांदी मिळालेनंतर फाडुन टाकणेचे खोटे आश्वासन दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीचे पतीने मला चांदी दिलेली असताना सुध्दा मी प्रतिवादीवर खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीकडून जास्तीची चांदी वसुल करणेसाठी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

वा.दा.का.दा.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by GANI MANIK NADAF
Date: 2025.09.22 11:37:57 +0530

दिनांक – १९.०९.२०२५

(जी. एम. नदाफ)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
इचलकरंजी.